# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः19.06.2026** **वारःशुक्रवार**

1. भारत जगासाठी विश्वासार्ह भागीदार म्हणून उदयाला येत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. राज्यात विधान परिषदेच्या 11 जागांसाठी 99 टक्के मतदान
3. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आज नागपूरमध्ये 'ॲल्युमिनियम एक्सट्रूजन प्रेस' ची पायाभरणी करणार
4. गडचिरोलीतील सहा लोह खनिज खाणी राज्य खनिज महामंडळाला देण्याची मुख्यमंत्र्यांची केंद्राकडे मागणी आणि
5. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने पक्षादेश जारी करत बोलवलेल्या बैठकीला सहा खासदार अनुपस्थित

**<u>पंतप्रधान</u>**

'भारत जगासाठी एक विश्वासार्ह भागीदार म्हणून उदयाला येत आहे', असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते काल फ्रान्समध्ये पॅरिस इथं भारतीय समुदायाला संबोधित करत होते. एके काळी दोन देशांमधील संबंध केवळ व्यापारावर आधारित असायचे, परंतु आज व्यापाराबरोबरच 'विश्वास'ही तितकाच महत्त्वाचा ठरत असल्याचं मोदी म्हणाले. भारत आज नवोन्मेष, तंत्रज्ञान आणि सर्वसमावेशक विकासाच्या माध्यमातून भावी पिढ्यांसाठी संधी निर्माण करत आहे, देशात गेल्या 12 वर्षात अनेक क्षेत्रात क्रांतिकारी बदल झाले आहेत, असंही त्यांनी सांगितलं. फ्रान्स दौऱ्यात, पंतप्रधान नीस इथं झालेल्या भारत इनोव्हेट्स कार्यक्रमात, जी सात देशांच्या परिषदेमध्ये तसंच  विवाटेक शिखर परिषदेत सहभागी झाले. फ्रान्समधल्या अग्रगण्य उद्योगपतींसमवेत त्यांनी उच्चस्तरीय बैठकाही घेतल्या. दरम्यान, फ्रान्स आणि स्लोव्हाकिया या दोन देशांचा यशस्वी दौरा आटोपून पंतप्रधान नरेंद्र मोदी नवी दिल्लीकडे रवाना झाले आहेत.

**<u>विधान परिषद</u>**

राज्यात विधान परिषदेच्या 11 जागांसाठी काल 99 टक्के मतदान झालं. यात नागपूर मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीचाही समावेश आहे. पुणे, ठाणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, यवतमाळ, अहिल्यानगर आणि वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर या सहा जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. तर सोलापूर, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, भंडारा-गोंदिया, नाशिक, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर-जालना आणि नागपूरमध्ये काल मतदान झालं. एकंदर 7 हजार 47 मतदारांपैकी 6 हजार 978 मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. मतमोजणी 22 जूनला होणार असून त्याच दिवशी निकाल जाहीर केला जाईल.

**नागपूर**

राज्यातील विधान परिषदेच्या सहा जागा बिनविरोध निवडून आल्या आहेत; उर्वरित अकरा जागांवर महायुतीला मोठा विजय मिळेल, असा विश्वास मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. त्यांनी काल नागपूरमध्ये प्रसार माध्यमांशी संवाद साधला.

**राजनाथसिंह**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आज नागपूरमधील अंबाझरी इथल्या 'यंत्र इंडिया लिमिटेड'च्या आयुध कारखान्यात 10 हजार टन क्षमतेच्या 'ॲल्युमिनियम एक्सट्रूजन प्रेस' ची पायाभरणी करणार आहेत. देशाच्या संरक्षण सामग्री उत्पादनासाठी ही एक्सट्रुजन प्रेस अत्यंत महत्त्वाची मानली जाते. संरक्षण क्षेत्राच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारं उच्च दर्जाचं ॲल्युमिनियम एक्सट्रुजन बनवण्याची क्षमता या एक्सट्रुजन प्रेसमुळे वाढणार असून यामुळे स्वदेशी उत्पादनाला चालना मिळेल, असं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**मंदिर संवर्धन-कोल्हापुर**

पश्चिम महाराष्ट्र विकास आराखड्यांतर्गत श्री महालक्ष्मी मंदिर परिसरातील नूतन प्रदक्षिणा मार्ग आणि परिवार देवता मंदिर संवर्धन कामकाजाचा प्रारंभ केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते उद्या होणार आहे. या कार्यक्रमानंतर अमित शाह यांची कोल्हापूर इथं जाहीर सभा होणार आहे. इचलकरंजी इथंही सहकारी बँकेच्या कार्यक्रमाला ते उपस्थित राहणार आहेत.

**नीटयूजी**

येत्या 21 जून रोजी होणाऱ्या नीट युजी पुनर्परिक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी काल आढावा बैठक घेतली. परीक्षा प्रक्रियेत नीतीमूल्ये, पारदर्शकता आणि कार्यक्षमतेची सर्वोच्च मानके राखण्याची सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना यावेळी केली. ही फेरपरीक्षा मुक्त आणि न्याय्य वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजनांची तयारी झाली असल्याची सुनिश्चिती करावी, सर्व स्तरांवर योग्य समन्वय राखावा, अशा सूचना प्रधान यांनी दिल्या.

**लोहखनिज खाणी**

गडचिरोलीतील सहा लोह खनिज खाणी केंद्र सरकारनं राज्य खनिज महामंडळाला द्याव्यात, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय कोळसा आणि खनिकर्म मंत्री जी. किशन रेड्डी यांच्याकडे केली आहे. राज्यातील खनिकर्म आणि ऊर्जा निर्मिती संदर्भात जी. किशन रेड्डी यांच्या समवेत काल बैठक झाली; त्यावेळी ते बोलत होते. गडचिरोलीमध्ये दर्जेदार लोहखनिजामुळे भविष्यात देशातील महत्त्वाचं औद्योगिक आणि पोलाद उत्पादन केंद्र म्हणून गडचिरोली विकसित होईल; आणि यातून 3 लाख कोटींची गुंतवणूक येईल तसंच लाखो रोजगार निर्माण होतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

**उबाठा खासदार**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं काल पक्षादेश जारी करत बोलवलेल्या बैठकीला नऊ पैकी सहा खासदार अनुपस्थित होते. या बैठकीला संजय राऊत, अनिल देसाई, अरविंद सावंत आणि राजाभाऊ वाजे

उपस्थित होते. तर नागेश आष्टिकर, संजय देशमुख, संजय जाधव, संजय दीना पाटील, ओमप्रकाश राजेनिंबाळकर आणि भाऊसाहेब वाकचौरे हे खासदार बैठकीला अनुपस्थित राहिले. या सहा खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातल्या शिवसेनेत सामील होत असल्याचं पत्र लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना सादर केलं आहे. मात्र, ही प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

**<u>आंदोलन-वाशीम</u>**

यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख यांच्या कथित पक्षांतराच्या निषेधार्थ वाशिम शहरात काल उबाठा शिवसेना  पक्षानं आंदोलन केलं. आंदोलनामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

**<u>अन्नसुरक्षा</u>**

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने देशातील सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना अन्न सुरक्षा नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. अन्न तयार करणं, त्यावरील, पॅकिंग आणि साठवणूक या सर्वांसाठी वापरल्या जाणाऱ्या सर्व उपकरणांचा तसंच अन्नाच्या संपर्कात येणाऱ्या पृष्ठभागांचा दर्जा फूड-ग्रेड आणि गंजरोधक असणं आवश्यक असल्याचं प्राधिकरणाने म्हटलं आहे. अशा उपकरणांची नियमित स्वच्छता, निर्जंतुकीकरण आणि देखभाल करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

**<u>पु.ल.स्मृतीसन्मान</u>**

'आशय सांस्कृतिक'च्या वतीनं आणि 'पु. ल. परिवारा'च्या सहयोगानं आयोजित यंदाचा पु. ल. स्मृती महोत्सव येत्या 24 आणि 25 जून रोजी पुण्यात होणार आहे. कथक नृत्यांगना पंडिता शमा भाटे यांना यंदाचा 'पु. ल. स्मृती सन्मान' प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती महोत्सवाच्या आयोजकांनी निवेदनाद्वारे दिली. हा महोत्सव पुण्यातील राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाच्या सभागृहात दोनही दिवस सायंकाळी 5 ते 8 दरम्यान होणार आहे.

**<u>जीएसटीभवन-चंद्रपूर</u>**

चंद्रपूर इथल्या अत्याधुनिक आणि भव्य अशा जीएसटी म्हणजे वस्तु आणि सेवा कर भवनाचं लोकार्पण अर्थराज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते काल झालं. या सोहळ्याला चंद्रपूरचे पालकमंत्री अशोक उइके, जीएसटीचे सहआयुक्त विनोद गवई यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. चंद्रपूरच्या विकासाचा वेग कायम राखत, जिल्ह्याला प्रगतीच्या नव्या उंचीवर नेण्याचा आमचा संकल्प आहे, असं जयस्वाल यांनी यावेळी सांगितलं.

**<u>दशपर्णीअर्क महोत्सव-धुळे</u>**

कृषी विभाग, उमेद अभियान आणि पाणी फाऊंडेशन यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या फार्मर कप 2026 उपक्रमांतर्गत धुळे जिल्ह्यात नुकताच दशपर्णी अर्क महोत्सव झाला. या महोत्सवात जिल्ह्यातील शेतकरी गटांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत 33 हजार 600 लिटर दशपर्णी अर्काची निर्मिती केली, असं जिल्हा अधीक्षक

कृषी अधिकारी सुरज जगताप यांनी सांगितलं. या उपक्रमामुळे नैसर्गिक शेतीबाबत जागरूकता वाढण्यास तसंच सेंद्रिय आणि शाश्वत कृषी पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहन मिळालं, असंही जगताप यांनी सांगितलं.

**जलसाठा-गोंदिया**

'तलावांचा जिल्हा' म्हणून ओळख असलेल्या गोंदिया जिल्ह्यात या वर्षी जलसंकटाचं सावट निर्माण झालं आहे. लघु प्रकल्पांमध्ये केवळ 13 टक्के तर मध्यम प्रकल्पांमध्ये 20 टक्के जलसाठा शिल्लक आहे. त्यामुळे प्रशासनासह नागरिकांचीही चिंता वाढली आहे. यंदा पाऊसमानही कमी राहण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने नागरिकांना पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहन केले आहे.

**निधन**

नामवंत मल्ल किसनराव मोहोळ यांचं काल रात्री पुण्यात निधन झालं. ते 86 वर्षांचे होते. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे ते वडील होत. आज सकाळी दहा वाजता वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**हवामान**

राज्याच्या सर्वच विभागात तुरळक ठिकाणी आज सोसाट्याचा वारा आणि विजांसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याचीही शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार